# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक १५/०७/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील रेवतकर लेआउट उमरेड येथे दि. १६/०६/२०२२ चे १०.०० वा. चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेश देवराव गुरनुले वय ३० वर्ष, रा. कन्हांडला ता.उमरेड यांनी त्यांची एमएच— ३१/डीएच— ५२६३ क्रमांकाच्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल रेवतकर ले आउट उमरेड येथील संतोष कामळी यांचे घरासमोर ठेवुन काम करीत होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची कि. १०,०००/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक अरविंद चव्हाण मो.क्र. ७४९९६०४६७२ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बेला** — दिनांक 14/07/22 चे रात्री 09.22 वा. ते 15/07/22 चे 03.00 वा. चे सुमारास पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**